# प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली
## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे व पालघर जिल्हा)
(०२३५८) २८२३८७

अंक ४४/२०१९ | दिनांक ३१/०५/२०१९ | कालावधी ५ दिवस


**डॉ. अशोककुमार चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२३७३३९६

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २५/०५/२०१९ ते ३१/०५/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०१/०६/२०१९ सकाळी ८:३० पासून ०५/०६/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २५/०५ | २६/०५ | २७/०५ | २८/०५ | २९/०५ | ३०/०५ | ३१/०५ | | ०१/०६ | ०२/०६ | ०३/००६ | ०४/०६ | ०५/०६ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३४.० | ३२.६ | ३२.४ | ३३.४ | ३३.६ | ३४.० | ३३.४ | कमाल तापमान (अं.से) | ३७ | ३७ | ३६ | ३५ | ३५ |
| २७.० | २६.० | २६.४ | २५.६ | २६.० | २६.० | २६.२ | किमान तापमान (अं.से) | २४ | २४ | २४ | २४ | २४ |
| ० | ० | १ | ० | ० | ० | ० | मेघाच्छादन (ऑक्टा) | २ | ३ | ३ | २ | ४ |
| ७६ | ७३ | ७८ | ७६ | ७२ | ७५ | ७६ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ८४ | ८४ | ८४ | ८४ | ८३ |
| ६६ | ६५ | ७८ | ६९ | ६७ | ६७ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ३६ | ४३ | ४९ | ४६ | ४३ |
| ४.८ | ४.३ | ४.५ | ४.० | ४.९ | ४.६ | ४.४ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ८ | ९ | ११ | ९ | ८ |
| आ. | प. | ई.पू. | आ. | आ.द. | आ. | वा.उ. | वाऱ्याची दिशा | नै.प. | नै.द. | नै.द. | नै.द. | नै. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | २३५९.६ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला
**दिनांक १ ते ५ जून, २०१९ पर्यंत आकाश ढगाळ राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| उन्हाळी भात | पक्वता | • तयार झालेल्या भात पिकाची सकाळी "वैभव" विळयाने जमिनीलगत कापणी करून मळणी करून २ ते ३ उन्हे देऊन धान्य वाळवावे. |
| खरीप भात | रोपवाटीका पूर्वतयारी | • भात रोपवाटीकेसाठी जमीन नांगरून ढेकळे फोडावीत आणि प्रती गुंठा क्षेत्रास १०० किलो शेणखत जमिनीत मिसळावे. जमिनीचा उतार लक्षात घेऊन, उंच निचऱ्याच्या जागी तळाशी १२० सें.मी. व पृष्ठभागी ९० सें.मी. रुंदीचे, ८ ते १० सें. मी. उंचीचे उतारानुसार योग्य त्या लांबीचे गादीवाफे तयार करावेत.<br>• खरीप हंगामासाठी लागणाऱ्या बियाण्यांची तसेच रासायनिक आणि सेंद्रिय खताची साठवण करावी. |
| नागली | रोपवाटीका पूर्वतयारी | • नागली रोपवाटीकेसाठी नांगरणी करून प्रती प्रती गुंठा क्षेत्रास २५० किलो कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे. जमिनीचा उतार लक्षात घेऊन, उंच निचऱ्याच्या जागी तळाशी १२० सें.मी. व पृष्ठभागी ९० सें.मी. रुंदीचे, ८ ते १० सें. मी. उंचीचे उतारानुसार योग्य त्या लांबीचे गादीवाफे तयार करावेत. |
| चारापिके | पूर्वतयारी | • चाराचवळी व मका पिकाच्या पेरणीसाठी जमिनीची नांगरट व कुळवणी करून जमीन मऊ व भुसभुशीत करावी आणि हेक्टरी ५ ते १० टन शेणखत किंवा कंपोस्ट जमिनीत मिसळावे. |
| आंबा | फळधारणा अवस्था | • काढणी योग्य फळांची काढणी 'नूतन' झेल्याच्या सहाय्याने चौदा आणे (८० ते ८५ टक्के) पक्वतेला देठासह सकाळी १० वाजेपर्यंत किंवा संध्याकाळी ४ नंतर त्वरीत करावी. यामुळे फळामधील साक्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. आंब्याची फळे काढल्यानंतर सावलीमध्ये ठेवावीत तसेच आंबा फळांची वाहतूक रात्रीच्या वेळेस करावी. फळे काढणीच्या किमान ८ दिवस अगोदर झाडावर कोणतीही फवारणी करू नये.<br>• आंब्यावरील काढणी पश्चात बुरशीजन्य रोगापासून आंबा फळांचे संरक्षण करण्यासाठी काढणी नंतर लगेचच फळे ५२ अं.सें. तापमानाच्या पाण्यात १० मिनिटे बुडवून काढावीत व नंतर फळे पिकविण्यासाठी ठेवावीत. डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठाने शिफारस केलेल्या कोरोगोटेड फायबर बॉक्समध्ये फळे पकिंग करावीत.<br>• फळांचे फळमाशीपासून संरक्षण करण्यासाठी विद्यापीठाने शिफारस केलेले "रक्षक फळमाशी सापळा" प्रती हेक्टरी ४ या प्रमाणात बागेमध्ये झाडाच्या खालील बाजूच्या फांद्यावर लावावेत. फळगळ झालेली आंबा फळे गोळा करून नष्ट करावी व बागेत स्वच्छता ठेवावी.<br>• बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, नवीन लागवड केलेल्या आंबा बागेत ४ ते ५ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| नारळ | - | • नवीन लागवड केलेल्या नारळ बागेमध्ये पावसाळ्यात लहान रोपांना कोंब कुजणे या बुरशीजन्यरोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. या रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी झाडाच्या कोंबानजीकच्या गाभ्यावर पावसाळ्यापूर्वी करावी.<br>• बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, नारळ बागेत ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| चिकू | - | • चिकू फळांची पावसाळ्यात बुरशीजन्य रोगामुळे होणारी फळगळ नियंत्रणासाठी सुकलेल्या व रोगट फांद्या कापून त्याजागी १ टक्का बोर्डोपेस्ट लावावी व पावसाळ्याच्या अगोदर १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी. पुढील दोन फवारण्या १५ ते २० दिवसांच्या अंतराने कराव्यात.<br>• बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, नवीन लागवड केलेल्या चिकू बागेत ४ ते ५ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटीका | रोपवाटीका | • खरीप हंगामासाठी वांगी, मिरची आणि टोमेटो भाजीपाला पिकाची रोपे तयार करण्याकरिता ३ मी. लांब X १ मी. रुंद X १५ से.मी. उंचीच्या गादीवाफ्यावर प्रती चौरस मीटर क्षेत्रास ५ किलो शेणखत, ३५ ग्रॅम युरिया, १०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट व २५ ग्रॅम म्युरेट ओफ पोटेश मिसळून पाण्याची उपलब्धता असल्यास भाजीपाला बियाणांची पेरणी करावी. पेरणीपूर्वी बियाण्यास ३ ग्रॅम प्रती किलो प्रमाणे थायरम बुरशीनाशक चोळावे.तसेच रोपांचे मर रोगापासून संरक्षण करण्यासाठी पेरणीपूर्वी ३ ते ४ दिवस वाफ्यावर १ टक्का बोर्डोमिश्रणाची भिजवण करावी. रुजवा चांगला होण्यासाठी वाफे भाताच्या पेंढयाने आच्छादावेत. उगवण होईपर्यंत वाफ्यांना नियमित पाणी द्यावे.<br>• बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, फळबाग रोपवाटीकेस नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच गरजेनुसार रोपांसाठी सावली करावी.. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • जनावरांच्या शरीराचे तापमान संतुलित राहण्यासाठी जनावरांना ताजे स्वच्छ व थंड पाणी मुबलक प्रमाणात देण्यात यावे तसेच उष्णतेचा दाह कमी करण्यासाठी वैरणीवर १ टक्के गुळपाणी आणि ०.५ टक्के मीठ यांचे स्वतंत्र द्रावण करून शिंपडावे.<br>• तापमानात वाढ संभवत असल्याने उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी गोठ्याचे/कुकुटपालन शेडचे छप्पर गवत, भाताचा पेंडा, किंवा नारळाच्या झावळ्या यांनी झाकून त्यावर अतिउन्हाच्यावेळी पाणी पडेल अशी व्यवस्था करावी तसेच वारा वाहत असलेल्या दिशेने गोठयाच्या / शेडच्या बाजूस पाण्यात भिजवलेले बारदान किंवा गोणपाट बांधावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**
**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**